| | |
|---|---|
| | **विशेष दिवाणी दावा क्र.२२/२०२५**<br>**मधील अर्ज निशाणी क्र. ४१ खालील आदेश**<br>**(CNR- MHWS050001502025)** |

प्रस्तुतचा अर्ज वादी यांच्यातर्फे शेताचा गुगल मॅप, शेताची सह फोटो आणि तहसिलदार यांचे पत्राची छायांकीत प्रत, दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले म्हणणे विचारात घेतले. इतर प्रतिवादी क्र. ३ ते ९ यांनी प्रस्तुतच्या अर्जास त्यांचे म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्या इतर प्रतिवादींच्या म्हणण्याविना गुणदोषावर निकाली काढण्यात येत आहे. वादी यांच्यातर्फे विधीज्ञ ए.एस.बेरीया यांचा आणि प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे विधीज्ञ एम.व्ही.येवले यांचा युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी दाखल करु इच्छित असलेले शेताचा गुगल मॅप, शेताची सह फोटो आणि तहसिलदार यांचे पत्राची छायांकीत प्रत, अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत काय? | ..होकारार्थी.. |
| २. | आदेश काय? | .. अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. ०१ बाबत</u> :–**

३. वादी यांचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, या दाव्यात वादींनी प्रतिवादींच्या विरुध्द तात्पुरता मनाईचा अर्ज नि.क्र.५ व २६ दाखल केलेले आहे व ते अर्ज न्यायप्रविष्ट आहेत. वादी हे त्या तात्पुरत्या मनाईच्या अर्जाच्या अनुषंगाने शेताचा गुगल मॅप, शेताची सह फोटो आणि तहसिलदार यांचे पत्राची छायांकीत प्रत, दाखल करु इच्छीत आहेत. तरी, सदर दस्तऐवज दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

४. याउलट प्रतिवादींच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदरची

कागदपत्रे दाखल करण्यास प्रतिवादी क्र .१ व २ यांचा सक्त विरोध आहे त्यामुळे वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, या दाव्यात वादींनी प्रतिवादींच्या विरुध्द तात्पुरता मनाईचा अर्ज नि.क्र.५ व २६ दाखल केलेले आहे व ते अर्ज न्यायप्रविष्ट आहेत. वादी हे त्या तात्पुरत्या मनाईच्या अर्जाच्या अनुषंगाने शेताचा गुगल मॅप, शेताची सह फोटो आणि तहसिलदार यांचे पत्राची छायांकीत प्रत, दाखल करु इच्छीत आहेत. ते दस्तऐवज अभिलेखावर आले तर वादींचा तात्पुरता मनाईचा अर्ज नि.क्र. ५ व २६ हे गुणदोषावर निकाली काढण्यास ते उपयुक्त होवू शकतात. त्यामुळे वादी यांच्या विधीज्ञांचा उपरोक्त युक्तीवाद विचारात घेतला तर उपरोक्त दस्त अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत आणि वादी यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे,

## <u>आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. ४१ मंजुर करण्यात येत आहे आणि वादी यांना उपरोक्त दस्तऐवज दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2025.09.12 17:19:50 +0530

स्थळ : मंगरुळपीर
दिनांक : १२.९.२०२५.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर.

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>C.J.S.D.,Mangrulpir |
| Date of Decision | : | 12.9.2025 |
| Judgment signed by the P.O. on | : | 12.9.2025 |
| Judgment uploaded on | : | 12.9.2025 |